<u>प्रेसनोट</u>

# पुणे पोलीसांनी राबविलेल्या सुरक्षतेच्या योजनांना शासकीय योजनांचा दर्जा

पुणे पोलीस आयुक्त रश्मी शुक्ला यांनी पुणे शहरामध्ये सुरू केलेल्या 'पोलीस काका योजना', 'सिटी सेफ ॲप', 'बडीकॉप' या योजनांना महाराष्ट्र शासनाने शासकीय योजनांचा दर्जा देवून, शासकीय योजनांचा लाभार्थीने लाभ घेतला, याबद्दल दि. ०९ नोव्हेंबर २०१७ रोजीच्या विविध वृत्तपत्रात महाराष्ट्र शासनाने प्रसिध्दकरण केले आहे.

पुणे पोलीस आयुक्त रश्मी शुक्ला यांनी शाळा व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये पोलीस विद्यार्थी सुसंवाद वाढविणे, पोलीस काका यांचे मार्फत तात्काळ मदत करणे, शाळा परिसरामध्ये छेडछाड, दादागिरी, रॅगिंग, अंमली पदार्थ विक्री यांना आळा बसविणे, विद्यार्थ्यांच्या मनामध्ये सुरक्षतेची भावना निर्माण करणे यासाठी 'पोलीस काका' हि योजना राबविण्यात येत आहे. त्यानुसार शाळा व महाविद्यालय परिसरात एका पोलीस कर्मचारी यांची पोलीस काका म्हणुन नेमणुक करून हि योजना राबविण्यात येत आहे. .

नोकरदार महिलांच्या सुरक्षतेसाठी 'बडी कॉप' हि योजना राबविण्यात येत असून, त्यांना तात्काळ मदतीसाठी वॉट्स ॲप ग्रुप मार्फत पोलीसांना संपर्क साधता येतो.

'सिटी सेफ ॲप' या योजनेव्दारे कोणत्याही नागरीकांना आपत्कालीन परिस्थीतीत तात्काळ पोलीस मदत मिळु शकते.

वरील योजनांचा फायदा बऱ्याच नागरिकांना, विद्यार्थ्यांना होत असल्याबद्दल विविध थरातुन प्रतिसाद मिळत आहे. या तिन्ही योजनांना शासकीय योजना म्हणुन घोषित करुन, त्यांचा लाभ जनतेला चांगल्याप्रकारे होत असल्याबद्दल व जनतेने या योजनांचा फायदा घेतल्याबद्दल दि. ०९/११/२०१७ रोजी महाराष्ट्र शासनाने जनतेचे धन्यवाद मानले आहे.